**प्रेस नोट दिनांक २७/०४/२०१९**

**खडक पोलीस ठाणे, पुणे शहर**

**हरविलेल्या ०४ वर्षीय मुलाचे नातेवाईकांचा तात्काळ शोध घेऊन, मुलास आईवडीलांचे ताब्यात सुखरुप परत.**

---

दिनांक २५/०४/२०१९ रोजी खडक पोलीस ठाणे, पुणे येथे पोलीस हवा. १८७१ शिंदे हे ठाणे अंमलदार म्हणुन कर्तव्यावर असताना इसम नामे - १) अभिजित विकास मासुळे, वय ३१ वर्ष, रा. घोरपडे पेठ, पुणे २) संतोष आदीनाथ निकम, वय २४ वर्ष रा. सदर यांना मुलगा नामे गौरांग स्वप्नील परदशी, वय ०४ वर्ष हा खडकमाळ आळी, गणपती मंदीर या ठिकाणी रडत असताना मिळुन आला. सदर मुलास नमुद व्यक्तींनी खडक पोलीस ठाणे या ठिकाणी आणले असता, त्यास आपला नाव पत्ता सांगत येत नव्हता.

सदर मुलाचे नातेवाईकांचा शोध होणेकामी खडक पोलीस ठाणेकडील पोलीस कर्मचारी महावीर दावणे, संदीप कांबळे यांनी सदर मुलाचा फोटो खडक पोलीस ठाणेचे व्हॉटसअप ग्रुपवर पाठविला. तसेच सदर मुलाबाबत ते पोलीस ठाणे हद्दीमधील वेगवेगळया लोकांना मुलाचा फोटो दाखवुन त्याचे नातेवाईकांबाबत माहीती काढण्याचा प्रयत्न करीत होते. नमुद कर्मचारी हे अनेक लोकांना मुलाबाबत माहीती सांगत असताना व त्याच दरम्यान मुलाचे आईवडील देखील मुलाचा शोध घेत असताना, मुलाचे वडीलांना नागरिकांकडुन एक मुलगा खडक पोलीस ठाणे येथे असल्याची माहीती प्राप्त झाली. सदर मुलाचे वडील नामे - स्वप्नील गजानन परदेशी, वय ३८ वर्ष रा. ४६२ गुरुवार पेठ, पुणे हे मुलाबाबत माहीती विचारणेसाठी पोलीस ठाणेस आले. त्यावेळी पोलीस ठाणेमध्ये असलेल्या मुलास ओळखुन त्यांनी सदरचा मुलगा आपला मुलगा गौरांग असल्याचे ओळखले. सदर मुलाचे बाबत आई वडीलांकडे खातरजमा करुन त्यास वडीलांचे ताब्यात सुखरुपपणे देण्यात आले आहे.

